| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा क्रमांक १३८/२०२६**<br>**CNR NO MHST06003852026**<br><br>**वादी – सोमनाथ जालिंदर कुंभार व १**<br>**विरुध्द**<br>**प्रतिवादी– अतुल धनदास खरात व इतर** |

## निशाणी १६ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी, दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र. ३ व १० यांची चुकीची नावे टंकलिखित झाली असून सदर नावात प्रस्तुत अर्जाप्रमाणे दुरूस्ती होऊन मिळावी अशी विनंती वादींनी केली आहे.

२. वादींनी प्रस्तुत अर्जात पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रमांक ३ भिकू महिबु खरात यांचे नाव भिकू महेबूब खरात असे व प्रतिवादी क्रमांक १० यांचे नाव गौरी नवनाथ खरात ऐवजी गौरी नवनाथ नामदास असे नजरचुकीने टंकलिखित झाले आहे. वादींनी सदर नावाऐवजी प्रतिवादी क्रमांक ३ चे नावात भिकू महिबु खरात व प्रतिवादी क्र. १० चे नावात गौरी नवनाथ खरात अशी दुरूस्ती होण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी निशाणी क्र. २४ अन्वये म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, वादी हे ग्रामपंचायत आंधळी येथे नोकरीस असून वादी सर्वांना वैयक्तिक नावाने ओळखतो व त्याला सर्व प्रतिवादी यांची माहिती आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे व प्रस्तुत अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास वादी खर्च बसवून प्रस्तुत अर्ज मंजूर करावा.

४. वादी व प्रतिवादी यांचे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तूतचा दावा हा निरंतर ताकिदीसाठी दाखल केला असुन मौल्यवान स्थावर मिळकतीसंदर्भात आहे. वादी व प्रतिवादी यांची कथने पाहता असे

दिसून येते की, प्रस्तावित दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असल्याने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सबब, दुरूस्ती करणे न्यायोचित होईल व वादी व प्रतिवादी यांच्यामधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात एकाच वेळी कायदेशीर गुंतागुत न वाढवता निकाली काढणेस न्यायालयास मदत होईल. सबब, वादीवर खर्च बसवून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे:–

:: **आदेश** ::

१. निशाणी क्रमांक १६ चा अर्ज रूपये ४००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. सदरचा रूपये ४००/– खर्चाची रक्कम ही तालुका विधी सेवा समिती यांना अदा करण्यात यावी.

३. वादी यांनी १४ दिवसांचे आत प्रस्तावित दुरुस्ती मुळ दाव्यात करुन दुरुस्ती प्रत सादर करावी.

सही/–
(श्रीमती ए. वाय. शेख)
सह दिवाणी न्यायाधीश, क. सतर, दहिवडी.

दिनांक – ०९/०६/२०२६
ठिकाण – दहिवडी